# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 26/09/2023 (मंगळवार) दुपार

---

## घरफोडी

**पो.स्टे. बेला :-** अंतर्गत ०९ किमी अंतरावर मौजा सिंघोरी येथे दिनांक २५/०९/२०२३ चे १२.०० वा. ते १६.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे- गजानन रामाजी डूकरे, वय ३३ वर्षे, रा. वार्ड क्र. ०१ सिंघोरी ता. उमरेड जि. नागपुर हे शाळेमध्ये मुलांना सोडण्याचे काम करत असुन फिर्यादी यांची पत्नी ही शेतीचे काम करते. फिर्यादी व त्यांची पत्नी कामाला गेले असता कोणीतरी अज्ञात इसम याने घराचे आत प्रवेश करून घरातील खोलीला लागलेले कुलुप तोडुन कपाट मधील ठेवलेले १) सोन्याची नथ ०३ गॅम किंमती ६०००/- रू २) सोन्याचे लॉकेट ०२ ग्रॅम किंमती ४०००/- रू ३) चांदीचे करदुडे ११ नग १५ तोळे किंमती ७५००/-रू. ४) नगदी ७५००/- रू असा एकुण २५,०००/-रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतेंन्द्र रंगारी पो.स्टे. बेला मो. नं. ८९७५६०४२८८ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. रामटेक :-** अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा चाचेर येथे दिनांक २४/०९/२०२३ ते दिनांक २५/०९/२०२३ चे २०.०० वा. ते ०६.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे- नंदकिशोर सदाशिव काळे वय ३४ वर्ष, रा. चाचेर ता. मौदा हे शेतात काम करण्यासाठी गेले असता गोठयात जावून पाहीले असता बंडीचे दोन लोखंडी चाक, एक लोखंडी बंडी, टिकास, फावडे, विळे, दतारी, लोखंडी पलंग व ट्रॅक्टरची लोखंडी पाटी, दोन सायकल इतके सामान एकूण किंमती ३५,०००/- रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रेहपाडे मो. नं. ७०३८२४२०५५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत खुंटबा उड्डाण पुल जवळ काटोल येथे दिनांक २५/०९/२०२३ चे ०३.३० वा. ते ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुनिल अनिल शर्मा, वय ३३ वर्ष रा. उकवा तहसिल परसवाडा जि. बालाघाट हे सिव्हील इंजिनीयर म्हणुन तारा प्रोजेक्ट जेव्ही कंपनी बालाघाट मध्ये काम करतात. दि. २५/०९/२०२३ रोजी सकाळी ८/३० वा. सुमारास फिर्यादीला पोस्टे काटोल येथुन फोन आला कि, हायवेचे पि. एस. आय. भिलावे सोबत स्टाफ सह पेट्रोलिंग करित असतांना पहाटे ०४/०० वा. चे सुमारास स्कॉपिओ गाडी फोर विलर एम. एच.—४६ डब्लु ९४६५ चा चालक **आरोपी नामे— ओम गजानन कवटे, रा. लोहारी सावंगा नरखेड** हा मुर्ति रोडने जात असता खुंटबा पुलाजवळ आरोपिला झोपेची डुलकी लागल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण बिघडल्याने रोडच्या खाली उतरून गाडी पलटी झाली होती. सदर स्कॉपिओ गाडीमध्ये सेट्रींगचे लोखंडी तराफे भरले होते. पोलिसांनी चालक आरोपी यांना विचारले असता उडवा उडविचे उत्तर दिल्याने त्याचे वाहन चेक केले असता त्याचे वाहनात लोखंडी सेन्ट्रींगचे प्लेट १७ नग प्रति प्लेट २०००/—रू. प्रमाणे एकुण ३४०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेत असल्याचे मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पवन वाघमारे मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर